# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


गो.वि./म.वि.वि.वि./ 2321 /2022 दिनांक: 5/05/2022

## परिपत्रक

विषय :– महाविद्यालयात रिक्त असलेली प्राचार्यांची पदे तात्काळ भरण्याबाबत.

संदर्भ :– शासन निर्णय क्रमांक:आढावा–प्र. क्र.१२५ (भाग–८)/म. शि.५, दिनांक १२ नोव्हेंबर २०२१

विद्यापीठाशी संलग्नित सर्व अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयांना कळविण्यात येते कि, २८ अनुदानित महाविद्यालयामध्ये प्राचार्यांची पदे रिक्त आहेत. संदर्भीय शासन निर्णयानुसार प्राचार्य संवर्गातील रिक्त असलेली पदे भरण्यासाठी निर्बंध शिथिल केलेले आहे. परंतु सदर रिक्त पदे भरण्याबाबत संस्था/महाविद्यालयांकडुन कार्यवाही करण्यात येत नसल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास येत आहेत. तसेच विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालये सुध्दा प्राचार्य पद भरण्याबाबत कार्यवाही करीत नसल्याचे दिसुन येते.

तथापी प्राचार्य संवर्गातील पदे भरण्यासाठी निर्बंध शिथिल झालेले असल्यामुळे सर्व अनुदानित महाविद्यालयांनी शासन निर्णयात नमुद नुसार तातडीने प्राचार्य पदे भरण्याची कार्यवाही पुर्ण करावी. तसेच विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयांनी प्राचार्य पदे भरण्याबाबत तातडीने कार्यवाही घ्यावी.

ज्या संस्था/महाविद्यालये रिक्त असलेले प्राचार्य पद भरण्याची कार्यवाही घेणार नाही, अशा सर्व महाविद्यालयांना पुढील सत्र २०२२–२३ मध्ये कार्यकारी प्राचार्य/स्वाक्षरी अधिकार प्रदान न करण्याबाबत विद्यापीठ स्तरावर निर्णय घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

मा. प्र– कुलगुरु यांच्या आदेशानुसार

( देवेंद्र एम.झाडे )
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:–

१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र–कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.